॥ ॐ ऐम् ऱ्हीम् क्लीम् चामुण्डायै विच्चे ॥

# श्री देवी चामुंडेश्वरी सेवा समिती, मुंबई

(स्थापना : २९/०१/१९७८)

(सोसायटी रजि. क्र. बीओएम् २१०/७९ जी. बी. बी. एस्. डी. दि. १९/०४/१९७९)
(मुंबई पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन. क्र. एफ - ५४४६ (मुंबई) दि. ०७/०६/१९७९.

## ४८ वा वार्षिक अहवाल २०२५ - २६



**समितीचे कार्यालय :**

द्वारा श्री प्रकाश गजानन पाटील
ई/२, सह्यगिरी सोसायटी, सोनावाला रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३.
भ्रमणध्वनी : ९८३३९०५६३२/ ९९६७५७७४०९
ई-मेल : Devichamunda2021@gmail.com
वेबसाईट : www.chamundeshwariandurle.com

# नवरात्र उत्सव २०२६

**सन्माननीय सभासद,**
**सप्रेम नमस्कार, विनंती विशेष,**

प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही श्री देवी चामुंडेश्वरी नवरात्र उत्सव अश्विन शुक्ल प्रतिपदा (घटस्थापना) शालिवाहन शके १९४८ (११ ऑक्टोबर २०२६) ते अश्विन शुक्ल दशमी १९४८ (२० ऑक्टोबर २०२६) या दरम्यान साजरा करण्यात येणार असून या निमित्ताने मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. श्री देवी चामुंडेश्वरीच्या पारंपारिक उत्साहात व आनंदात साजऱ्या केल्या जाणाऱ्या या उत्सवात आपण सर्वांचा सहभाग अपेक्षित आहे. आपण आपल्या उपस्थितीने या कार्यक्रमाची शोभा वाढवावी व देवी प्रसादाचा लाभ घ्यावा ही विनंती. मंदिर अग्रशाळेत निवास करू इच्छिणाऱ्या भक्तगणांनी व्यवस्थापकांना पूर्वसूचना द्यावी.

ज्या भक्तांना नवरात्रीदरम्यान नवचंडी पूजन करावयाचे आहे, त्यांनी मंदिर व्यवस्थापक अथवा समितीचे चिटणीस श्री प्रकाश पाटील यांजबरोबर संपर्क साधावा. ज्यांना नवचंडीदरम्यान महाप्रसादाचे यजमानपद घ्यावयाचे आहे ते भक्त रुपये १०,००० भरणा करून कोणत्याही एक दिवसाचा महाप्रसाद पुरस्कृत करू शकतात.

**श्री. प्रकाश गजानन पाटील**
**(मानद सचिव)**
**श्री देवी चामुंडेश्वरी सेवा समिती**

## दैनंदिन कार्यक्रम

### ११ ऑक्टोबर २०२६ ते २० ऑक्टोबर २०२६

**(अश्विन शुक्ल प्रतिपदा ते अश्विन शुक्ल दशमी शके १९४८)**

| | |
|---|---|
| सकाळी ५ ते ६ | : अभ्यंगस्नान, पूजा, काकड आरती |
| सकाळी ६ ते ९ | : श्री देवी आरास |
| सकाळी ९ ते १२ | : श्री सप्तशती पाठ |
| दुपारी १२ ते १ | : श्री देवी प्रसाद |
| संध्याकाळी ६ ते ७ | : श्री देवीची आरती, तीर्थप्रसाद |
| संध्याकाळी ७ ते ९ | : प्रासादिक भजन |
| रात्री ९ नंतर | : स्थानिक भजने |

**अष्टमीला सायंकाळी श्री देवी चरणी होम व पूजा केली जाईल. उत्सवाच्या काळात कार्यक्रमामध्ये गरजेनुसार फेरफार करण्याचा अधिकार सेवा समितीला राहील.**

**आपले नम्र,**

**श्री देवी चामुंडेश्वरी सेवा समिती, मुंबई**

# श्री देवी चामुंडेश्वरी सेवा समिती, मुंबई

## ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

**सन्माननीय सभासद,**

**सप्रेम नमस्कार, विनंती विशेष !**

श्री देवी चामुंडेश्वरी सेवा समिती, मुंबई या संस्थेची ४८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दिनांक ३० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ठीक ०९.०० वाजता सन्मित्र मंडळ गोरेगाव, गोगटेवाडी रस्ता, आरे रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०० ०६३** येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित राहून सभेच्या कामकाजात भाग घ्यावा, ही विनंती.

## सभेपुढील कामकाज

**१) संस्थेच्या ४७ वा वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर ते आतापर्यंत दिवंगत झालेल्या सभासद बंधू भगिनींना श्रद्धांजली वाहून दुखवट्याचा ठराव सभेत मंजूर करणे.**

**२) दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडलेल्या संस्थेच्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.**

**३) दिनांक १ एप्रिल २०२५ ते दिनांक ३१ मार्च २०२६ या कालावधीचा संस्थेचा छापील वार्षिक अहवाल व या कालावधीचे अधिकृत लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेले आयव्यय पत्रक व ३१ मार्च २०२६ अखेरचा ताळेबंद व त्यावरील त्यांचा अहवाल वाचून सभेत मंजूर करणे.**

**४) सन २०२६-२७ या वर्षाकरिता सरकारमान्य अधिकृत लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांच्या मानधनास सभेत मंजुरी देणे.**

**५) आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर करणे.**

**६) मंदिर व भक्तनिवासाला रंगरंगोटी करण्याविषयक व मंदिराच्या सभोवताली पूर्णतः अथवा अंशतः धातूचा अथवा इतर प्रकारचा मंडप बांधावा का याचा निर्णय घेणे.**

**७) श्री देवी चामुंडेश्वरी देवस्थान स्थानिक सल्लागार उपसमिती या संस्थेबरोबर केलेल्या व्यवहारांची नोंद घेऊन त्यास स्वीकृती देणे.**

**८) २०२५-२६ दरम्यान उत्पन्न व खर्चाच्या अंदाजपत्रकापेक्षा अधिक खर्च झाल्यास त्यावर विचारविनिमय करुन स्वीकृत करणे अथवा सुयोग्य निर्णय घेणे.**

**९) सन २०२८ रोजी होणाऱ्या श्री देवी चामुंडेश्वरी शतक महोत्सवी वर्धापन दिना निमित्त होणऱ्या कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणे व निर्णय घेणे.**

**१०) माननीय अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या आयत्या वेळेच्या कामांचा विचार करणे.**

**आपला नम्र,**

**स्थळ : मुंबई**

**दिनांक : २० जुलै २०२६**

**प्रकाश गजानन पाटील (सचिव)**

**• टीप:**

१) घटनेतील नियम १० नुसार गणसंख्येअभावी ही सभा तहकूब झाल्यास ती त्याच दिवशी, त्याच जागी, त्याच कामकाजाचा विचार करण्यासाठी अर्ध्या तासाने भरेल व अशा सभेस गणसंख्येची गरज भासणार नाही.

२) संस्थेच्या कामकाजासंबंधी तसेच वार्षिक जमाखर्चासंबंधी सूचना अथवा प्रश्न असल्यास ते लेखी स्वरूपात संस्थेच्या मुंबई कार्यालयात सायंकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवसाव्यतिरिक्त, वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपूर्वी किमान ४ दिवस अगोदर आणून देणे या त्याची रीतसर पोच घ्यावी.

३) आपण सर्वांची वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थिती प्रार्थनीय आहे. सभेस कृपया वेळेवर उपस्थित राहावे जेणेकरून कामकाजासाठी व विचारविनिमयासाठी पुरेसा वेळ मिळेल.

# श्री देवी चामुंडेश्वरी सेवा समिती
## ४८ वा वार्षिक अहवाल
## (१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६)

**सन्माननीय सभासद,**

**सप्रेम नमस्कार विनंती विशेष,**

श्री देवी चामुंडेश्वरी सेवा समिती, मुंबई या संस्थेचा ४८ वा वार्षिक अहवाल आपणास सादर करताना कार्यकारी मंडळास विशेष आनंद होत आहे.

● **श्रद्धांजली**

श्री देवी चामुंडेश्वरी सेवा समिती, मुंबई या संस्थेच्या ज्या ज्ञात अज्ञात सभासदांचे अहवालसाली दु:खद निधन झाले, त्या सर्वांना संस्थेच्या वतीने आम्ही आदरपूर्वक श्रद्धांजली वाहतो. ईश्वर त्यांच्या आत्म्यांना सद्गती देवो.

● **वार्षिक सर्वसाधारण सभा**

अहवालसाली संस्थेची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत संस्थेचा वार्षिक अहवाल (२०२४-२५) जमाखर्च व ताळेबंद (२०२४-२५) व लेखापरीक्षकांची निवड (सन २०२५-२६) इत्यादी कामांना मंजूरी देण्यात आली.

● **घटस्थापना**

प्रतिवर्षाच्या परंपरेनुसार नवरात्र उत्सव २२ सप्टेंबर २०२५ ते २ ऑक्टोबर २०२५ यादरम्यान पार पडला. मंदिर गर्भगृहात फुलांची आरास व मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. उत्सव काळात देवी पूजा, दैनंदिन आरती व नैवेद्य, सप्तशती पाठ, कुमारिका पूजन, होम व हवन इत्यादी धार्मिक कार्ये संपन्न झाली.

● **९८ वा वर्धापनदिन उत्सव**

दरवर्षीप्रमाणे श्री देवीचा वर्धापनदिन उत्सव दिनांक २३ जानेवारी व २४ जानेवारी २०२६ दरम्यान पार पडला. उत्सवातील नवचंडी महापूजेचे वा महाप्रसादाचे यजमानपद सौ. संगीता व श्री. सतीश पाटील, राहणार चेरकाडी तालुका जिल्हा उडिपी व राज्य कर्नाटक यांनी स्वीकारले होते. हजारो भक्तजनांनी या प्रसंगी देवी दर्शन घेऊन तीर्थ प्रसादाचा लाभ घेतला. स्थानिक कलाकारांनी आपली कला सादर करून देवीची सेवा तसेच भक्तांचे मनोरंजन केले.

इसवी सन २०२७ मध्ये होणाऱ्या महाप्रसादाचे यजमानपद व नवचंडी पूजनाची जबाबदारी श्री. विनोद विलास जळवी व कुटुंबीय राहणार उमरखाडी दक्षिण मुंबई महाराष्ट्र यांनी स्वीकारली आहे. तसेच २०२८ साली होणाऱ्या शतचंडी पूजा व महाप्रसाद याची जबाबदारी श्री.गणेश पाटील व कुटुंबीय, यांनी स्वीकारली आहे.

### ● पर्यावरण सुरक्षा

वृक्षसंवर्धन व छपाई वरील खर्चात कपात करण्याच्या उद्दिष्टाने संस्थेने वार्षिक अहवाल व उत्सवाचे निमंत्रण संस्थेच्या संकेतस्थलावर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. सभासदांनी वेळोवेळी संकेतस्थळाचा परामर्श घेऊन येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती करून घ्यावी. तसेच आपला इ मेल पत्ता व मोबाईल नंबर (व्हाट्सॲप) संस्थेच्या वेब साईट वर अपलोड करावा.

### ● श्री देवी मंदिर व भक्तनिवास यांचे रंगकाम

वर्षा ऋतूनंतर देवी मंदिर व भक्तनिवासाचे सध्याचे रंगकाम जुने झाल्यामुळे नवीन रंगरंगोटी करून सौन्दर्यवृद्धी करणे आवश्यक आहे. मंदिराचे शंभरावे वर्ष जवळ आल्यामुळे रंगकामाचा दर्जा व रंगसंगती आकर्षक करणे आवश्यक आहे. आमची सर्व भक्तजनांना नम्र विनंती आहे की या कार्यासाठी आपण संस्थेस आर्थिक साहाय्य करावे. ज्यांना प्रत्यक्ष रंग अथवा रंगकामासाठी लागणारे साहित्य द्यावयाचे आहे त्यांनी पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

### ● समाजोपयोगी उपक्रम

संस्थेने घटनेतील उद्दिष्टांनुसार शैक्षणिक व वैद्यकीय सेवा प्रदान करण्यासाठी निधी गोळा केले आहेत. आर्थिक वर्ष २०२४-२५ या काळात समितीने घटनेतील उद्दिष्टांप्रमाणे समाजोपयोगी वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी पावले उचलली. समितीचे माजी उपाध्यक्ष कै. सदानंद शांताराम पाटील व त्यांच्या दिवंगत पत्नी कै. शीला सदानंद पाटील यांच्या कुटुंबियांकडून प्रामुख्याने शैक्षणिक व वैद्यकीय उद्दिष्टांसाठी प्राप्त झालेली आर्थिक मदत व पूर्वापार जमलेल्या उपलब्ध निधींमधून

1. नेत्र तपासणीसाठी त्रिनेत्र ब्रँड फूंदूस आय कॅमेरा (Posterior, Anterior and Dry Eye Imaging with Advanced Analysis Tools for a Comperehensive Eye evaluation) सुयश हॉस्पिटल, कुडाळ यांना पुरविण्यात आला. त्या नेत्र तपासणी यंत्राद्वारे अनेक रुग्णांच्या नेत्रविकारांचे निदान होऊन त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आल्या.
2. विद्याप्रसारक विश्वस्त मंडळ, परुळे या मुंबई पब्लिक ट्रस्ट अधिनियम १९५० नियम २९ अंतर्गत नोंदणीकृत संस्थेच्या केळूस येथे चालविल्या जाणाऱ्या एस के पाटील विद्यामंदिर या शाळेच्या इमारत दुरुस्तीसाठी विनंती पत्र संस्थेला प्राप्त झाले. या शाळेच्या दुसऱ्या मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी वर्ग बांधण्यास संस्थेने ६.५० लाख रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे. या अंतर्गत या आर्थिक वर्षात रुपये २ लाख रक्कम अदा करण्यात आली असून उरलेली रक्कम नवीन आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत देण्यात आली.
3. चेरकडी, तालुका उडिपी, कर्नाटक येथील आर के पाटकर शारदा हायर एलिमेंटरी स्कूल या आपल्या ज्ञातीच्या ९७ वर्ष जुन्या संस्थेची सध्याची इमारत जीर्ण झाल्याने विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन नवीन इमारत बांधण्यात येत आहे. या संस्थेची विनंती लक्षात घेऊन त्यांना रुपये १,००,०००/- (रुपये एक लक्ष फक्त) एवढी मदत केली गेली. ही शाळा कॅनरा कुडाळ देशस्थ गौड ब्राह्मण मंडळ हे मंडळ चालवत असून संस्थेचा पूर्ण शाळा बांधणीचा अपेक्षित खर्च तीन कोटी रुपये आहे. या संस्थेचे अध्यक्ष श्री. सतीश पाटील हे

आपल्या संस्थेचे कर्नाटकमधील सक्रिय सभासद आहेत. ज्या सभासदांना या सत्कार्यासाठी श्री देवी चामुंडेश्वरी सेवा संस्थेमार्फत देणगी द्यावयाची आहे त्यांनी संस्थेशी संपर्क साधावा. ज्यांना संस्थेला स्वनामाने वैयक्तिक स्वरूपात देणगी द्यावयाची असेल त्यांनी संस्थेचे अध्यक्ष श्री सतीश पाटील ९८४५२४३४६६ यांच्याशी संपर्क साधावा. या संस्थेकडे ८० जी हे आयकर कायद्या अंतर्गत कर वाचवणारे प्रमाणपत्र उपलब्ध आहे.

4. श्री देवीचे मंदिर स्थित असलेल्या आंदुर्ले गावामध्ये प्लास्टिक व तत्सम कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी व पर्यावरण सुरक्षेचे नियम पालन करण्यासाठी एक प्लास्टिक कचरा प्रोसेस करावयाची सुमारे रुपये १२१५४० किमतीचे संयंत्र आंदुर्ले ग्रामपंचायतीला दान केली आहे. या मागे पर्यावरण हानी टाळणे व पाळीव दुभती जनावरे प्लास्टिकचा कचरा खाऊन आजारी पडू नये हा उद्देश आहे.

संस्थेच्या करविषयक सल्लागारांनी व लेखापरीक्षकांनी शिक्षण व आरोग्यावर केल्या जाणाऱ्या खर्चाबाबत वेळोवेळी खालील सूचना केलेल्या आहेत.

१. शक्यतो संस्थेने शिक्षणविषयक व आरोग्यविषयक उपक्रम आवश्यक परवानगी असल्यास स्वत: चालवावेत.

२. जर संस्थेकडे या कार्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ व परवानगी नसेल तर या क्षेत्रात ज्या संस्था प्राधान्याने काम करीत आहेत व शक्यतो ज्यांच्याकडे सेक्शन ८० जी अंतर्गत करविषयक सवलत उपलब्ध आहेत अशा संस्थांना आर्थिक मदत करावी. मदतीपूर्वी संस्थांच्या हेतूंची व कार्यक्षमतेबद्दल खात्री करून घ्यावी.

३. निधी प्राप्त झाल्यावर शक्यतो लवकरात लवकर त्याचा उपयोग करावा अथवा त्यावर कर आकारला जाऊ शकतो. असे खर्च संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर करून घ्यावेत.

४. आरोग्य व शिक्षण निधीमध्ये दान स्वीकारताना दात्यांपुढे प्रायोजित उपक्रमांची माहिती ठेवावी व त्यांची दान केलेल्या निधीचा अशा उपक्रमांवर खर्च करण्यासाठी स्वीकृती घ्यावी जेणेकरून विवाद उपस्थित होणार नाहीत.

५. शैक्षणिक दान हे शैक्षणिक संस्थेसच करावे. त्यांनी नेमलेल्या काँट्रॅक्टर्स अधवा पुरवठादारांना करू नये.

### ● धार्मिक शिक्षण

संस्थेने मुलांना त्रिकाल संध्या, तसेच देवतांचे पूजन करता यावे व स्तोत्रे मुखोद्रत व्हावी या हेतूने वासंतिक शैक्षणिक वर्ग आयोजित करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली. या वर्गांची संकल्पना यशस्वी होण्यासाठी श्री मनोहर पाटील व श्री तेजस सामंत यांनी पुढाकार घेतला. या वासंतिक वर्गात सामील झालेल्या मुलांना दाभोली मठ तसेच नृसिंहवाडी येथील पुजारी व इतर अधिकारी व्यक्तींनी मार्गदर्शन केले.

### भक्तांसाठी सुविधा

भक्तांची इच्छा लक्षात घेऊन समितीने श्री देवीच्या फायबर आणि पंचधातूच्या मूर्ती बनवून घेतलेल्या आहेत. फायबर च्या मूर्तीचे मूल्य रुपये १,०००/- असून पंचधातूच्या मूर्तीचे मूल्य रुपये ५०००/- आहे. ज्या भक्तांना मूर्ती खरेदी करण्याची इच्छा असेल त्यांनी कृपया मंदिर व्यवस्थापकांशी संपर्क साधावा.

**श्री देवी मंदिराला देणगी देण्याची पद्दत**

श्री देवी चामुंडेश्वरी समितीने मंदिराची देखभाल व सुशोभीकरण, मजबुतीकरण व भक्तजनांची निवासव्यवस्था आदि गरजा लक्षात घेऊन धार्मिक विधी तसेच स्थायी सुविधा निर्मितीच्या हेतूने विविध निधी स्थापन केले आहेत. यात मंदिर देखभाल निधी, वर्धापनदिन उत्सव निधी, नवरात्र उत्सव निधी, नंदादीप निधी, नित्य पूजा निधी, शिक्षण निधी, आरोग्य निधी यांचा समावेश आहे. आमची सर्व भक्तांना कळकळीची विनंती आहे की त्यांनी संस्थेच्या विविध निधींमध्ये भरघोस आर्थिक मदत करून संस्थेला आर्थिकदृष्ट्या स्वबळावर उभे राहण्यास मदत करावी.

देणगी देण्याची पद्धत खालीलप्रमाणे आहे.

अ) धनादेश देण्यासाठी

मराठी - श्री देवी चामुंडेश्वरी सेवा समिती

English - Sheree Devi Chamundeshwari Sewa Samiti

ब) ऑनलाईन रक्कम भरणा करण्यासाठी

Bank Name : Saraswat Cooperative Bank Limited,
Account No.028200100009893
IFSC Code - SRCB0000028
Branch - Goregaon East, Mumbai 400 063

**OR**

Bank Name : State Bank of India
A/c No. 30299461434
IFSC Code - SBIN0001975
Beranch - Goregaon East, Mumbai 400 063.

ऑन लाइन भरणा करणाऱ्या भक्तांनी जमा केलेल्या देणगीबाबत संपूर्ण माहिती (युनिक ट्रानझेंक्शन नंबर क्रमांकासहित) उदाहरणार्थ देणगीदाराचे नाव, पूर्ण पत्ता, पिन कोड, दूरध्वनी व भ्रमणध्वनी, देणगीची तारीख, देणगीचा उद्देश व इ-मेल devichamunda2021@gmail.com या मेल पत्त्यावर पाठवावी.

**संकेतस्थळ**

सर्व सभासद, देणगीदार व भक्तजनांना विनंती आहे की त्यांनी समितीने भक्तगणांच्या आग्रहावरून चालू केलेल्या संकेतस्थळावर www.chamundeshwariandurle.com जाऊन तेथील माहिती वाचावी व या संकेतस्थळाच्या गुणवत्ता व परिणामकारीकता वाढवण्यासाठी सूचना कराव्यात.

या संकेतस्थळावर उपयुक्त माहिती या सदरात देवीची पूजा करण्याची पद्धती, चंडीकवच, श्री सूक्त, लक्ष्मी सूक्त, श्री देवी चामुंडेश्वरी व श्री देवी आंदूर्लाई हिची आरती व स्तोत्रांच्या उच्चारण पद्धती दर्शवणारे व्हिडिओ उपलब्ध केलेले आहेत. तसेच मंदिराचा इतिहास व मंदिरात श्री देवी, श्री गणपती व मूळ पुरुष यांच्या चरणी केला जाणाऱ्या धार्मिक विधींची माहिती दिलेली आहे. या संकेतस्थळावर समितीने नित्य पूजा पादी अपलोड केलेली आहे. सर्वांना विनंती आहे की त्यांनी आपल्या पूजेचा पूर्ण पत्ता, दूरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक, ई मेल पत्ता, गोत्र व तारीख तपासून दुरुस्ती असल्यास संस्थेच्या कळवावे. यामुळे यादीत सुधारणा करता येईल व प्रसाद पाठवण्यास अडचण येणार नाही.

**समारोप**

संस्थेचा हा ४८ वा वार्षिक अहवाल आपणापुढे मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

श्री देवी चामुंडेश्वरीच्या भक्तगणांवर व त्यांच्या कुटुंबियांवर तिच्या कृपेचा वरदहस्त राहो व त्यांना निरोगी दीर्घायुष्य व सुख संपत्ती प्राप्त होवो हीच आमची श्री देवी चरणी प्रार्थना,

हा वार्षिक अहवाल येथे समाप्त करीत आहोत. लोभ आहेच. तो वृद्धिंगत व्हावा ही विनंती.

**आपला नम्र**

**प्रकाश गजानन पाटील (मानद सचिव)**

## AUDIT REPORT

**D . S. DESAI & CO.**
**CHARTERED ACCOUNTANTS**
**MUMBAI - 400 057**

**Trustees,**
**Shree Devi Chamundeshwari Seva Samiti,**
**MUMBAI - 400 063.**
**------------------------------------**

Dear Sir,

We have audited the books of account for the year ended on 31st March, 2026 maintained by Shree Devi Chamundeshwari Seva Samiti, Mumbai and take pleasure in submitting the audited statements of Income & Expenditure Account for the year ended on 31st March, 2026 and Balance Sheet as on that date along with this audit report thereon. Our following observations and remarks merit your attention.

The working of the Samiti during the year resulted into the surplus amount of Rs. 14,96,390.19. As compared to surplus amount of earlier year the current Account Surplus has been shown considerable increase this year. The overall religious etc. collections received during the year are seen increased considerably. However, expenditure on religious activities are not increased in ratio with increased in religious income during the year. Donations in kind account are increased during the year. These Donations Include silver articles, cost of sarees etc. offerings before the goddess as also medical etc. equipment. This is just for the information.

As has been reported in audit report of earlier years a suitable scheme be prepared by the Trustees for accepting the donations in kind of Ornaments etc. properly certified and valued at the time of accepting such donation. It may exhibit a correct and true picture of the affairs of the Trust during the year. However, it seems the Trustees have not taken any action in the matter.

No expenditure was incurred on construction or renovation etc. on Mandir Premises as well as Bhakta Nivas Building during the year. As seen from the enclosed Accounts Trustees have properly utilized Health Fund Balances by donating Rs. 6,70,000.00 as against donation amount received of Rs. 5,23,001.00 during the year. Where, as expenditure out Education Fund Account incurred during the year was Rs. 3,00,001.00 is found less as compared to total donation received of Rs. 9,54,502.00 during the year. Trustees may decide for appropriate expenses from these Charitable Fund Accounts. The fund Account balances amount to Rs. 163.17 lacs. The total amount of immovable property of Rs. 136.20 lacs of the Samiti and the liquid funds of fixed deposits of Rs. 66 lacs held by the samiti. The comparative analysis of the liquidity may be viewed effectively by the Trustees.We have seen the proceedings of Trustee meetings during the year and those were found properly maintained. Books of Account for the year were maintained properly. All round economy was found observed in the expenses by the Trustees. The financial position of the Seva Samiti is sound.

Thanking you

Yours faithfully

FOR D.S, DESAI & CO.
CHARTERED ACCOUNTANTS



MUMBAI, 06th August, 2026.

PARTNER
UDIN: 26013730KUNJEB5393

**Shree Devi Chamundeshwari Seva Samiti, Mumbai**

Balance Sheet as on 31st March, 2026

| FUNDS & LIABILITIES | Amount (₹) | Amount (₹) |
|---|---|---|
| **TRUST FUND** | | |
| Balance as per last Balance Sheet | | 1,49,393.14 |
| **MANDIR PREMISES JIRNODHAR FUND ACCOUNT** | | |
| Balance as per last Balance Sheet | | 31,01,217.75 |
| **BHAKTA NIWAS CONSTRUCTION NIDHI** | | |
| Balance as per last Balance Sheet | | 81,74,230.00 |
| **RELIGIOUS FUND ACCOUNTS** | | |
| Nitya Pooja Nidhi | 5,70,495.00 | |
| Utsav Nidhi | 10,05,841.00 | |
| Navaratri Utsav Nidhi | 18,32,016.00 | |
| Nandadeep Nidhi | 3,29,126.56 | 37,37,478.56 |
| **EDUCATION FUND** | | |
| Balance as per last Balance Sheet | 5,60,394.86 | |
| Add: Specific Donations Transferred | 9,51,000.00 | |
| | 15,11,394.86 | |
| Less: Educational Aid Paid | 3,00,001.00 | 12,11,393.86 |
| **HEALTH FUND** | | |
| Balance as per Last Balance Sheet | 2,95,810.00 | |
| Add: Specific Donations Transferred | 5,23,001.00 | |
| | 8,18,811.00 | |
| Less: Health Assistance Paid | 6,70,000.00 | 1,48,811.00 |
| **DONATION FOR STEEL FURNITURE** | | 50,000.00 |
| ORNAMENTS REVALUATION FUND | | |
| Balance as per last Balance Sheet | | 15,65,415.00 |
| **Recoveries Towards Cost Of Devi Idol** | | |
| Balance per last Balance Sheet | 0.00 | |
| Add: Collection This Year | 80,100.00 | |
| Transferred to Income & Expenditure A/c. | 80,100.00 | |
| | 11,600.00 | 68,500.00 |
| **CURRENT LIABILITIES & PROVISIONS** | | 18,780.00 |
| Deposts Cemtext Co. Balance | | |
| Deposit From Sthanik Upsamiti | 2,54,015.00 | |
| Less: Refunded This Year | 2,54,015.00 | 0.00 |
| **INCOME & EXPENDITURE ACCOUNT** | | |
| Balance as per last. Balance Sheet | 53,80,539.50 | |
| Add: Surplus this year | 14,96,390.19 | 68,76,929.69 |
| | **Total** | **2,51,02,149.00** |

## Shree Devi Chamundeshwari Seva Samiti, Mumbai

Balance Sheet as on 31st March, 2026

| PROPERTY & ASSETS | Amount (₹) | Amount (₹) |
|---|---|---|
| LAND Balance | | 9,737.00 |
| Mandir Premises Renovation Expenditure Balance | | 30,67,676.00 |
| BHAKTA NIWAS CONSTRUCTION | | |
| Balance as per last Balance Sheet | | 83,67,622.00 |
| NEW HALL PREMISES ACCOUNT | | |
| Balance as per last Balance Sheet | | 13,75,000.00 |
| COMPOUND WALL CONSTRUCTION-Balance | | 2,65,870.00 |
| WELL CONSTRUCTION Balance | | 20,000.00 |
| FURNITURE & FIXTURES | | |
| Balance as per last Balance Sheet | 4,40,162.00 | |
| Add: Addition This Year | 1,58,500.00 | |
| | 5,98,662.00 | |
| Less: Depreciation | 59,866.00 | 5,38,796.00 |
| WATER COOLER Balance | | |
| Balance as per last Balance Sheet | 24,010.00 | |
| Less: Depreciation | 2,401.00 | 21,609.00 |
| CCTV CAMERA | | |
| Balance as per last Balance Sheet | 40,662.00 | |
| Less: Depreciation | 4,066.00 | 36,596.00 |
| ORNAMENTS: GOLD, SILVER ETC | | |
| Balance as per last Balance Sheet | 21,02,267.00 | |
| Add: Donations of Ornaments | 9,44,308.00 | 30,46,575.00 |
| SHREE DEVI IDOLS/PHOTO ETC | | |
| Balance as per last Balance Sheet | 57,296.00 | |
| Add: Idols Purchases | 1,13,500.00 | |
| Less: Sales etc. | 1,70,796.00 | |
| Profit on Sale | 80,100.00 | |
| | 11,600.00 | 1,02,296.00 |
| AIR CONDITIONERS | | |
| Balance as per last Balance Sheet | 84,807.00 | |
| Less: Depreciation | 12.720.00 | 72,087.00 |
| SOLAR EQUIPMENTS-PROJECT SUN | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,90,858.00 | |
| Less: Depreciation | 28,628.00 | 1,62,230.00 |
| DEPOSITS/TELEPHONE ETC-Balance | | 500.00 |
| SHREE DEVI MANDIR WEBSITE | | |
| Balance as per last Balance Sheet | | 23,500.00 |
| | | **1,71,10,094.00** |

# Shree Devi Chamundeshwari Seva Samiti, Mumbai

Balance Sheet as on 31st March, 2026

| FUNDS AND LIABILITIES | Amount (₹) | Amount (₹) |
|---|---|---|
| **Amount Brought forward** | | **2,51,02,149.00** |
| | **Total** | **2,51,02,149.00** |

Examined and found correct
for D.S.Desai & Co.
Chartered Accountants
(Arun D. Desai) Partner

Date : 06-08-2026

## Shree Devi Chamundeshwari Seva Samiti, Mumbai

Balance Sheet as on 31st March, 2026

| PROPERTIES AND ASSETS | Amount (₹) | Amount (₹) |
|---|---|---|
| Brough forward | | 1,71,10,094.00 |
| **Income Tax Recoverable (TDS)** | | |
| AY 2025-26 | 16,566.00 | |
| AY 2026-27 | 39,682.00 | 56,248.00 |
| **Garden Development Expenditure** | | 1,50,000.00 |
| **Fixed Deposit** | | 66,26,684.00 |
| **Cash and Bank Balances** | | |
| **In Savings Bank account with** | | |
| State Bank of India, Goregaon | 3,03,179.62 | |
| Saraswat Coop Bank Ltd, Goregaon | 4,70,654.90 | |
| Union Bank of India, Kudal | 2,09,595.70 | |
| Bank of India, Pat | 1,46,699.78 | |
| Cash in Hand | 28,993.00 | 11,59,123.00 |
| | **Total** | **2,51,02,149.00** |

| | | | |
|---|---|---|---|
| sd/-<br>सतीश पाटील<br>अध्यक्ष | sd/-<br>महेंद्र पाटकर<br>कार्यकारी अध्यक्ष | sd/-<br>प्रकाश पाटील<br>मानद सचिव | sd/-<br>प्रसाद पाटील<br>खजिनदार |

## Shree Devi Chamundeshwari Seva Samiti, Mumbai

Income And Expenditure Account For The Year Ended 31st March 2026

| EXPENDITURE | Amount (₹) | Amount (₹) |
|---|---|---|
| **EXPENDITURE ON OBJECTS** | | |
| Religious: Puja, Navaratri Utsav etc. | 9,46,709.00 | |
| Electricity Charges | 55,490.00 | |
| Honararium etc | 1,44,000.00 | |
| Medical Assistance | 6,70,000.00 | |
| Donation to Educational Institution | 3,00,001.00 | |
| Garden Watering Expenses. | 24,800.00 | |
| Pollution Control Equipment | 1,21,540.00 | |
| Temple Cleaning Expenses. | 13,455.00 | 22.75,995.00 |
| Grampanchayat Taxes | | 8,633.00 |
| Bhakta Nivas Maintenance | | 99,336.40 |
| Printing Expenses | | 12,366.00 |
| Annual Report Printing Charges | | 25,826.00 |
| Annual General Meeting Expenses | | 8,800.00 |
| Audit Fees | | 10,000.00 |
| Prof. Fees | | 7,080.00 |
| Repairs & Maintenance | | 5,98,946.45 |
| Website Site Charges | | 17,200.00 |
| CCTV Repairs | | 9,500.00 |
| Conveyance & Traveling Expenses | | 17,358.00 |
| Advertisement Expense | | 10,000.00 |
| Locker Rent | | 1,652.00 |
| Miscellanenous Expenses | | 26,795.00 |
| Bank Charges | | 33.41 |
| Telephone Charges | | 7,110.00 |
| Zerox Expenses | | 25.00 |
| **Specific Fund Account Transfers** | 3,00,001.00 | |
| To Education Fund Account | 6,70,000.00 | 9,70,001.00 |
| To Health Fund Account | | |
| To Income Tax Deductions written off for A.Y. 2024-2025 | | 15,905.00 |
| **To Depreciation on** | | |
| Furniture@ 10% | 59,866.00 | |
| CC T.V Camera @ 10% | 4,066.00 | |
| Water Cooler@ 10% | 2,401.00 | |
| Air-Conditioner@ 15% | 12,720.00 | |
| Solar Equipemnts @ 15% | 28,628.00 | 1,07,681.00 |
| To Excess of Income over Expenditure | | 14,96,390.19 |
| | **TOTAL Rs.** | **57,26,633.45** |

Examined and found correct
for D.S.Desai & Co.
Chartered Accountants
(Arun D. Desai) Partner

Date : 06-08-2026

# Shree Devi Chamundeshwari Seva Samiti, Mumbai

Income And Expenditure Account For The Year Ended 31st March 2026

| INCOME | Amount (₹) | Amount (₹) |
|---|---|---|
| By Income From Trust Activities | | |
| For Shree Devi Nitya Puja/ Dharmik Vidhi Etc. | 10,001.00 | |
| For Navaratri Utsav | 12,57,933.00 | |
| For Nandadeep | 29,368.00 | |
| For Bhaktanivas Occupation | 2,37,450.00 | |
| For Education Fund | 9,54,502.00 | |
| For Health Fund | 5,23,001.00 | |
| For Maintenances | 2,55,604.00 | 32,67,859.00 |
| By Donations Received | | |
| General | 97,266.00 | |
| Donation In Kind | 9,44,308.00 | 10,41,574.00 |
| By Interest On: | | |
| Fixed Deposits | 4,03,919.45 | |
| Bank Balances | 31,680.00 | 4,35,599.45 |
| Educational Assistance Transferred To Educational Fund | 3,00,001.00 | |
| Medical Assiatance Transferred To Health Fund Account | 6,70,000.00 | 9,70,001.00 |
| Shree Devi Idols & Photo Account | | |
| Purchases Etc. | 1,12,800.00 | |
| Shree Devi Photo | 700.00 | |
| | 1,13,500.00 | |
| Less: Sales Etc. | 80,100.00 | |
| Closing Stocks Of Idols | 45,000.00 | |
| | 1,25,100.00 | |
| Profit On Sale Of Idols | 11,600.00 | 11,600.00 |
| | **Total Rs.** | **57,26,633.45** |

| sd/- | sd/- | sd/- | sd/- |
|---|---|---|---|
| सतीश पाटील<br>अध्यक्ष | महेंद्र पाटकर<br>कार्यकारी अध्यक्ष | प्रकाश पाटील<br>मानद सचिव | प्रसाद पाटील<br>खजिनदार |

## इतर माहिती

भक्त निवास / अग्रशाळा

श्री देवी चामुंडेश्वरी मंदिरात धार्मिक देवकार्यासाठी येणाऱ्या भक्तगणांची न्याहरी व निवासाची सोय व्हावी या हेतूने भक्तनिवास / अग्रशाळेची सुविधा उपलब्ध केलेली आहे. त्याचे निवासी सेवा शुल्क खालीलप्रमाणे आहे.

| | मोठी | मध्यम |
|---|---|---|
| वातानुकूलित | रुपये १२०० प्रति दिन | रुपये ६०० प्रति दिन |
| सामुदायिक हॉल | रुपये १०० प्रतिव्यक्ती प्रतिदिन, | |

नियम

१) अग्रशाळा / भक्त निवास हा मंदिराचा भाग आहे. त्यामुळे तेथील परिसराचे पावित्र्य राखले जाईल याची भक्तांनी काळजी घ्यावी.

२) भक्तगणांची योग्य ती चौकशी करून प्रवेश देण्याचा अधिकार व्यवस्थापकांकडे राहील.

३) सरकारी नियमांप्रमाणे काही आरोग्य विषयक प्रमाणपत्रे बाळगणे आवश्यक असेल तर ती प्रमाणपत्रे भक्तांनी सोबत बाळगावी.

४) भक्तगणांची संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी आगाऊ चौकशी करून निवास, जेवण व न्याहरी या बाबत नोंदणी व्यवस्थापकांकडे करावी.

५) निवासात खोल्यांचा वापर करण्याअगोदर भक्तांनी ऑफिस मधील रजिस्टर मध्ये आपली नोंदणी करून आपल्या आधार कार्डाची स्थळप्रत (photo copy) व्यवस्थापकांकडे देणे आवश्यक आहे.

६) आपल्या सूचना, तक्रारी, प्रतिक्रिया ऑफिस मध्ये ठेवलेल्या सूचनावहीत नोंद कराव्या व काही अनपेक्षित अडचणी आल्यास व्यवस्थापकांशी संपर्क साधावा.

७) निवासादरम्यान भक्तांनी स्वत:च्या वस्तूंची काळजी घ्यावी. संस्था कोणत्याही नुकसानीला जबाबदार राहणार नाही.

८) भक्तनिवासात मांसाहारी पदार्थ तसेच मद्य व नशा आणणाऱ्या पदार्थांचे सेवन करण्यास तसेच धूम्रपान करण्यास सक्त मनाई आहे.

९) भक्तनिवासाची मूळ हेतू भक्तांना देवी पूजनासाठी निवासी व्यवस्था व्हावी हा असल्यामुळे नवरात्र व वर्धापनदिन उत्सवाचे दिवस वगळता इतर दिवशी राहणाऱ्या भक्तांनी किमान एक धार्मिक विधी स्वत: अथवा पुजाऱ्यांच्या मार्फत करणे आवश्यक आहे.

१०) वर्धापनदिन उत्सवाचे दोन दिवस वगळता इतर दिवशी राहणाऱ्या भक्तांना निवासाचे शुल्क द्यावे लागेल.

११) ज्या भक्तांना नियमित औषधे घ्यावी लागतात त्यांनी आपल्या दररोजच्या घ्यावा लागणाऱ्या औषधांचा पुरेसा साठा आपल्याबरोबर ठेवावा.

**धार्मिक विधी**

श्री देवी मंदिरात व संलग्न गणपती व कुलपुरुष मंदिरात खालील विधी केले जातात. कोणताही विधी करण्याअगोदर विधी शुल्क भरून त्याची पावती पुजारी / व्यवस्थापकांकडून घ्यावी.

**श्री देवी चरणी केले जाणारे धार्मिक विधी व शुल्क.**

| | |
|---|---|
| कुंकुमार्चन | ₹७५ |
| अभिषेक | ₹१०० |
| एकादशमी | ₹१५० |
| पंचामृत पूजा | ₹१०० |
| देवी नैवेद्य | ₹३०० |
| सप्तशती पाठ | ₹७०० |
| देवी सहस्रनामावली | ₹४०० |
| नवचंडी पूजा (हवनासहित) | ₹३५,००० |
| देवी सहस्रावर्तन | ₹७,००० |
| देवी लघुरुद्र | ₹२,५०० |
| | |

**श्री कुलपुरुषासमोरील विधी व शुल्क**

| | |
|---|---|
| रुद्र एकादशमी | ₹२०० |
| रुद्र अभिषेक | ₹२०० |
| पुरुषसुक्त अभिषेक | ₹२०० |
| पंचामृत पूजा | ₹१०० |
| कुलपुरुष नैवेद्य | ₹३०० |
| कुलपुरुष लघुरुद्र | ₹२,००० |

**श्री गणेश चरणी केल्या जाणाऱ्या पूजा व शुल्क**

| | |
|---|---|
| अभिषेक | ₹१०० |
| एकादशमी | ₹१५० |
| पंचामृत पूजा | ₹१०० |
| श्री गणेश नैवेद्य | ₹३०० |
| गणपती सहस्रावर्तन | ₹७,००० |
| गणेश लघुरुद्र | ₹२,५०० |

भक्तगणांनी धार्मिक विधी करण्याअगोदर मंदिरातील पुरोहित श्री हरिश्चंद्र श्यामराव पाटील याना संपर्क करून धार्मिक विधींचे स्वरूप, येणार खर्च व इतर आनुषंगिक माहिती विचारून घ्यावी. जिथे आवश्यक असेल तिथे पुरोहित भक्तांना पूर्वकल्पना देऊन इतर ब्राह्मणांची मदत घेतील व अशा अतिरिक्त ब्राह्मणांची दक्षिणा व इतर आवश्यक गरजांची यजमानांना पूर्वकल्पना देतील.

**श्री देवी चामुंडेश्वरी मंदिरातील रंगमंचाच्या वापरासंबंधी नियमावली**

१. रंगमंच व त्यावरील सभागृहाचा वापर केवळ हिंदू समाजातील व्यक्तींनी मंगल कार्यासाठी करावा.

२. वर्धापनदिन उत्सव व नवरात्री दरम्यान सभागृहाचा वापर भक्तांच्या निवासासाठी केला जाईल.

३. या रंगमंच व त्यावरील सभागृहाचा विवाह, साखरपुडा, नामकरण विधी, मौंजीबंधन अथवा हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे प्रचलित असलेल्या धार्मिक संस्कारांसाठी (अंत्येष्टी वगळता) वापर करता येईल.

४. कार्यक्रम संपल्यावर वापर करणाऱ्या व्यक्तींना आपले सर्व सामान स्वखचनि न्यावे लागेल व सभागृहाची स्वच्छता स्वखचनि करून द्यावी लागेल,

५. विवाहासाठी रुपये १०,००० व इतर मंगल कार्यांसाठी रुपये ५,००० स्वच्छता व सुरक्षा शुल्क घेण्यात येईल.

६. संस्थेच्या अग्रशाळेतील खोल्यांच्या वापरासाठी वेगळे सेवा शुल्क द्यावे लागेल.

७. सभागृह मंदिर मालमत्तेचा भाग असल्यामुळे मांसाहार, धूम्रपान, इतर कोणत्याही मादक पदार्थांचे सेवन करण्यास सक्त मनाई आहे.

८. मंगलाष्टके वगळता ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही.

९. सभागृहाचा वापर जेवणासाठी करता येणार नाही.

हा रंगमंच व त्यावरील सभागृह हे संस्थेने हिंदू समाजातील सर्व आर्थिक स्तरांमधील व्यक्तींना माफक दरात धार्मिक संस्कारविधी करण्याची सोय व्हावी यासाठी श्री देवी चामुंडेश्वरी स्थानिक सल्लागार उपसमिती यांच्या विनंतीवरून बांधलेले आहे. यामुळे सभागृहातील मालमत्तेचा वापर काळजीपूर्वक व्हावा ही सर्वांची जबाबदारी आहे. संस्थेच्या नालमत्तेचे नुकसान झाल्यास संस्थेला नुकसानभपाई द्यावी लागेल.

देवीच्या मंदिराच्या गर्भगृहाला लागून असलेल्या सभामंडपामधे केवळ देवतेशी निगडित धार्मिक कार्ये होतील. इतर कुठलेही विधी होणार नाहीत.

श्री देवीच्या व्यवस्थापक व कार्यकारी समितीच्या पदाधिकाऱ्यांची नावे व भ्रमणध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे आहेत.

श्री महेंद्र दामोदर पाटकर (कार्याध्यक्ष), मुंबई ९८६७२९९९९१
श्री प्रकाश गजानन पाटील (सचिव), मुंबई ९८३३९०५६३२
श्री हरिश्चंद्र शामराव पाटील (मंदिर पुजारी) आंदुर्ले ९४२३५११५३४
मंदिर-०२३६२-२९९२७९

या अहवालसाली समितीला विविध निधींसाठी भक्तगणांनी लहान मोठ्या रकमांच्या देणग्या दिल्या, समिती अशा सर्व रोख व वस्तुरूप देणगी देणाऱ्यांची आभारी आहे. एकदा किंवा एकाहून अधिक वेळा रुपये पाच हजार किंवा अधिक रकमेच्या देणग्या देणाऱ्या दात्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

श्री. विठ्ठल सिताराम पाटकर, राहणार कोल्हापूर २०२२-२३ या आर्थिक वर्षात रुपये १०,००० रकमेची देणगी दिली होती. मात्र त्यांचे नाव जाहीर करणे राहून गेले होते. ते या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. त्यांना झालेल्या मानसिक त्रासाबद्दल समिती दिलगीर आहे.

यावर्षी महाप्रसादाचे यजमान सौ संगीता आणि श्री सतीश पाटील, राहणार चेरकाडी, तालुका आणि जिल्हा उडिपी यांनी महाप्रसादासाठी रुपये १,५०,०००/- ची देणगी देऊन संस्थेला मोठी मदत केली.

| देणगीदारांची नावे | रुपये |
|---|---|
| कै. शीला व कै. सदानंद शांताराम पाटील यांच्या गोरेगाव पूर्व, मुंबई येथे निवास करणाऱ्या कुटुंबियांकडून | १३,००,००० |
| श्रीमती शुभदा श्यामसुंदर दाभोलकर यांजकडून कै. श्यामसुंदर मधुसूदन दाभोलकर यांच्या पुण्यस्मृतीप्रित्यर्थ श्री निलेश दाभोलकर यांच्या माध्यमातून, अंधेरी पूर्व, मुंबई | १,५१,००० |
| कै. राजाराम कृष्णाजी पाटकर यांच्या इच्छापत्रान्वये कै. कृष्णाजी शिवाजी पाटकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ, श्री भिवा केळुस्कर यांजकडून, माईनवाडा | ८४,००० |
| आशिष कमलाकर जळवी, मुलुंड पूर्व मुंबई | ५५,५५५ |
| कै. चंद्रकांत लक्ष्मण पाटील याच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्री जितेंद्र चंद्रकांत पाटील यांजकडून, जोगेश्वरी पूर्व, मुंबई | ५१,००० |
| अंजली आणि विठ्ठल पाटकर, बोरिवली पूर्व, मुंबई | ५०,००० |
| जयंत रत्नाकर पाटकर, कांदिवली पश्चिम, मुंबइ | ४१,००० |
| आविश गौरव पाटील, पुणे | ३६,००१ |
| अभय गजानन पाटील, वास्को द गामा, गोवा | २७,००० |
| स्मिता जळवी C/o संतोष जळवी, सीवूड, नवी मुंबई | २५,००१ |
| पार्थ प्रसाद पाटील, विलेपार्ले (पूर्व) | २५,००० |
| चंद्रशेखर काशिनाथ पाटील व कुटुंबीय, गोरेगाव पूर्व, मुंबई | २५,००० |
| विनायक भालचंद्र पाटील, सिंगापूर | २५,००० |
| परशुराम शंकर पाटकर, पाट, तालुका वेंगुर्ला, सिंधुदुर्ग | २५,००० |
| नीलांबरी नंदकिशोर पाटील, दहिसर | २५,००० |
| वैशाली बालाजी पाटील राहणार पिटसबर्ग, यूएस यांजकडून कै. विनायक रघुनाथ पाटील (श्वशुर) कै. बालाजी रघुनाथ पाटील (पती) व कै. अनिल रघुनाथ पाटील (दीर) यांच्या पुण्यस्मरणार्थ | २५,००० |
| संजय बाळकृष्ण पाटील, गोरेगाव पूर्व, मुंबई | २५,००० |
| मधुकर पाटकर वांद्रे पूर्व, मुंबई यांजकडून कै लक्ष्मी पाटकर यांच्या स्मरणार्थ | २५,००० |
| अनंतरामा पाटील, पवई, मुंबई | २५,००० |
| उदय पाटील, C/o एस टी बोरवेल, हुमरट, तालुका कणकवली | २३,१७० |
| एडवोकेट आनंद रत्नाकर पाटील, वडाळा, मुंबई | २१,००० |
| सिद्धेश अजित पाटील, ठाणे | १७,५०१ |
| सचिन दीपक पाटकर, वडाळा, मुंबई | १६,०५१ |
| पाटील कुटुंबीय, पाट, सिंधुदुर्ग | १५,००० |
| वीणा विकास पाटील, खारघर | १२,५०० |
| अमेय अनिल पाटील, गोरेगाव पूर्व, मुंबई | ११,५०१ |
| उमा शंकर पाटील, ठाणे | ११,१११ |
| प्रकाश गजानन पाटील, गोरेगाव पूर्व, मुंबई | ११,००० |
| अथर्व संजय पाटील, गोरेगाव पूर्व, मुंबई | ११,००० |
| प्रीती लक्ष्मीकांत खानोलकर, जोगेश्वरी, मुंबई | ११,००० |
| कृत्तिका विनोद पाटकर यांजकडून कै. विनोद दयानंद पाटकर व कै. विलास दयानंद पाटकर यांच्या पुण्यस्मृतीप्रित्यर्थ, पुणे | १०,००२ |

| | |
|---|---|
| ऋता विनोद पाटकर यांजकडून कै. विनोद दयानंद पाटकर व कै. विलास दयानंद पाटकर यांच्या पुण्यस्मृतीप्रित्यर्थ, पुणे | १०,००२ |
| पद्मजा प्रदीप पाटील, ठाणे | १०,००२ |
| अदिती आणि अमोल हवालदार | १०,००१ |
| गणेश वासुदेव पाटील, मुलुंड, मुंबई | १०,००१ |
| हेमा शिरोडकर, वांद्रे पश्चिम, मुंबई | १०,००० |
| इंद्रजित शरद पाटील यांजकडून कै. शरद नरहरी पाटील यांच्या पुण्यस्मृतिप्रीत्यर्थ, पुणे | १०,००० |
| उदय पाटील आणि कुटुंबीय, हुमरट, तालुका कणकवली, सिंधुदुर्ग | १०,००० |
| विजय दत्तात्रेय पाटील, पुणे | १०,००० |
| सचिन पाटकर, वडाळा, मुंबई | १०,००० |
| वर्षा विजय पाटकर, जोगेश्वरी, मुंबई | १०,००० |
| दीपाली वागळे, पनवेल | १०,००० |
| गोवा बागायतदार सहकारी खरेदी विक्री संघ मर्यादित | ९,००० |
| राजाराम अवसरे, गोरेगाव पूर्व, मुंबई | ७,००० |
| मनोज पाटील के | ५,५५५ |
| प्रवीण दत्ताराम जळवी, खार, मुंबई | ५,५५१ |
| मंदार हेमंत पाटील, गोरेगाव, मुंबई | ५,५०१ |
| क्षमा पाटकर, पालघर | ५२०० |
| अनिकेत महेश जळवी | ५,१११ |
| शीतल सुभाष जळवी, मुंबई | ५१०१ |
| डॉक्टर केशवरावजी जोशी महाराज ठाणे | ५१०० |
| मोहन, पनवेल | ५००१ |
| वासुदेव अच्युत पाटील, मुलुंड पूर्व, मुंबई | ५००१ |
| संतोष अशोककुमार पाटील, बेंगळुरू | ५००१ |
| मंदार मोहन | ५००१ |
| अमोल पाटील, बोरिवली | ५००१ |
| दिलीप सदानंद पाटील, गोरेगाव, मुंबई | ५००१ |
| अमित अनंत पाटील | ५००१ |
| शंकर श्रीकांत पाटील, ठाणे | ५००१ |
| मानसी पाटील, बोरिवली पूर्व, मुंबई | ५००१ |
| सुनंदा सुरेश प्रभू, मुंबई | ५००१ |
| गौतम खानोलकर यांजकडून मातोश्री कै सुलोचना विश्वनाथ खानोलकर यांच्या पुण्यस्मृतीप्रित्यर्थ, भांडुप पश्चिम, मुंबई | ५००० |
| एस चंद्रशेखर पाटील, ईश्वर नगर, सरलेबेट्टु, मणिपाल | ५,००० |
| हर्षवर्धन पाटकर, बोरिवली पश्चिम, मुंबई | ५,००० |
| प्रदीप पाटील, गोरेगाव, मुंबई | ५,००० |
| राजीव रामचंद्र पाटकर, वांद्रे पश्चिम, मुंबई | ५,००० |
| शुभदा संजय पाटील, गोरेगाव पूर्व, मुंबई | ५,००० |

| | |
|---|---|
| **उषा दाभोलकर, गोरेगाव पूर्व, मुंबई** | ५,००० |
| **लक्ष्मीकांत मधुकर पाटकर, बोरिवली पूर्व, मुंबई** | ५,००० |
| **संतोष पाटील, बेंगळुरू** | ५,००० |
| **प्रीती जनमेजय पाटील, मुलुंड, मुंबई** | ५,००० |
| **किशोर सदाशिव पाटील, डोंबिवली पश्चिम** | ५,००० |
| **विष्णुदास पाटील, अम्बागिळू, उडिपी** | ५,००० |
| **प्रदीप पाटील, ठाणे** | ५,००० |
| **डॉक्टर मुरलीधर पाटील** | ५,००० |
| **मनोरमा सुरेश पाटील, किलांजे, उडिपी** | ५,००० |
| **पांडुरंग सदाशिव सामंत, म्हापसा** | ५,००० |
| **सचिन पाटकर, बावधन, पुणे** | ५,००० |
| **विपुल यशपाल उपासनी, मुंबई** | ५,००० |
| **प्रमिला पांडुरंग पाटील, दाभाळ, गोवा** | ५,००० |
| **गौरवी वरद नावेलकर, बेळगावी, कर्नाटक** | ५,००० |
| **प्रवीण** | ५,००० |
| **Ref.6064078519 (Details not availabl)** | ५,००० |

**★★ बँकिंग अथवा पेमेंट प्लॅटफॉर्म्स यांच्या मार्फत धनराशी पाठवल्यास दात्याचे नाव स्टेटमेंट मध्ये येत नाही. अशा वेळी संस्थेला ई मेल अथवा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना मोबाईलच्या मार्फत ट्रानड्रॉक्शन क्रमांक दिल्यास संस्थेला देणगीदारांची ओळख पटविणे व पावती देणे सुकर होईल.**

**वस्तुरूपी दान**

1. सौ. स्वरुपा अभय पाटील, वास्को, गोवा यांनी ३८ ग्राम वजनाचा व रुपये चार लाख एक्याण्णव हजार किमतीचा सुवर्ण हार देवीचरणी अर्पण केला.
2. कै. विष्णू विठ्ठल सामंत यांची नात गायत्री उमाकांत सामंत हिने के. रामचंद्र कृष्णाजी पाटकर यांच्या स्मरणार्थ रुपये २.९२ लाख किमतीची लॉकेट सहित सुवर्ण साखळी देवी चरणी अपर्ण केली.
3. रंजना मधुकर पाटकर यांनी १८ ग्राम वजनाचा व रुपये एक लाख चाळीस हजार किमतीचा सुवर्ण हार देवी चरणी अपर्ण केला.
4. राजाराम पाटील, राहणार फोन्डा, गोवा यांनी रुपये १४,५०० किमतीचा चांदीचा हार देवीला अर्पण केला.

५. उदय पाटील व कुटुंबीय, हुमरट, तालुका कणकवली यांनी सुमारे तेरा हजार रुपयाची बासुंदी देवी प्रसादासाठी उत्सवप्रसंगी भेट दिली.

६. हर्षदा बोरकर यांनी रुपये ६,२५० किमतीची सोन्याची नथ देवीला अर्पण केली.

७. चिन्मय विवेक पाटील यांनी रुपये २,२०० चे तेल दीप प्रज्वलनासाठी देवीस अर्पण केले.

**विशेष निवेदन**

इसवी सन २०२८ या वर्षी होणारी नवचंडी ही १०० वी नवचंडी पूजन व वर्धापनदिन उत्सव हा १०० वा वर्धापनदिन उत्सव असेल. येऊ घातलेल्या शतसांवत्सरिक उत्सवाचे महत्व लक्षात घेता २०२८ साली कोणते कार्यक्रम करावेत याच्या सूचना सभासदांनी समितीला लेखी कळवाव्यात. तसेच केलेल्या सूचनांच्या अंमलबजावणीसाठी खर्च अपेक्षित असल्यास सूचनाकर्ता किती खर्च करू इच्छितो ते ही कळवावे. सूचना लेखी असाव्यात व सूचनाकर्त्याचा इ मेल पत्ता व मोबाईल नंबर पूर्ण पोस्टल पत्त्यासहित उद्धृत करावा. जर एखाद्या भक्ताला २०२८ साली शतचंडी करावयाची असेल व त्यासाठीचा खर्च सोसायची तयारी असेल तर समितीला लेखी कळवावे. आलेल्या सूचनांचा कार्यकारी मंडळ साधकबाधक विचार करून निर्णय घेईल या त्याप्रमाणे उत्तर पाठवेल.

The Navachandi Puja to be performed and Vardhapandin to be celebrated in year 2028 will be 100th one and will be a significant milestone for devotees of Mother Goddess Shree Devi Chamundeshwari. Considering importance of the incoming event, we request members to send their suggestions about creative initiatives and innovative programs to be carried out during centenary year in writing to Samiti. If any expenditure is expected to be incurred for implementation of suggestions, the suggestor should also inform what would be his/her financial contribution. The e-mail, mobile and full postal address should be informed by person making suggestions. If any devotee is interested in conducting SHATACHANDI in year 2028, and bear expenses for same, please do inform to Samiti well in advance. The Executive Committee will take a final decision based on deliberations and will communicate their response accordingly.

## Daily program during Ashwin Navaratri

### 11th October 2026 to 20th Oct. 2026

**(Ashwin Shukla Pratipada to Ashwin Shukla Dashami Saka 1947)**

Morning 5 a.m. to 6 a.m. Abhyangsnan, || Evening 6 pm to 7 pm Shri Devi Arati
Puja Kakad Arati
Morning 6 a.m. to 9 a.m. Devi Alankar, Sthotram || Evening 7 pm to 9 pm Bhajan
Morning 9 to 12 Saptashati Path Evening 9 pm Bhajan
Afternoon 12 a.m to 1.00 p.m. Devi Prasad

The Annual General Meeting will be held on 30th August 2026 at Sanmitra Vidyalaya, Gogate Wadi, Aarey Road, Goregaon East, Mumbai 400 063 at 9.30 a.m. onwards to consider following.

1. To offer homage to devotees and members departed during the year for heavenly abode.
2. To approve minutes of 47th AGM held on 24th August 2025.
3. To take on record and approve printed annual report, Audited Income and Expenditure Account and Balance Sheet along with Auditors report for period between 1 April 2025 to 31 March 2026.
4. To appoint auditor and remuneration to auditor for FY 2026-27.
5. To approve proposals received for educational and health support from institutions.
6. To note actual income and expenditure against budgeted sums for FY 26 and approve excess or unbudgeted expenses.
7. To approve budget for Income and Expenditure during FY 2026-27.
8. To take policy decision and decide on budget for expenditure on painting of temple and Bhaktniwas.
9. To take on record and approve financial transactions between Seva Samiti and Shree Devi Chamundeshwari Devasthan Sthanik Upasamiti.
10. To consider and approve any urgent matters permitted by Chair.

**The painting of Shree Devi Temple and Bhaktniwas**
The Samiti proposes to undertake painting for temple and Bhakt Nivas during FY 27. The devotees who are willing to donate financially or by gifting colour and allied material may contact committee officials. It is necessary to paint the entire temple and Bhaktniwas and those who are willing to extend help, please contact commitee.

**Charitable Initiatives**
As per our constitution and also in line with regulatory guidelines under Sec. 12A of IT Act 1964, Samiti is required to incur substantial expenditure on education and health objectives.

During the year, Seva Samiti provided a Thri Netra Fundus eye camera for diagnosis of eye ailments to Suyash Hospital costing Rs.6.70 lakh. The committee also extended financial assistance of Rs.1.21 lakh to Andurle Gram panchayat for purchase of plastic waste processing

machine to dispose plastic waste. The committee further funded Rs.1 lac to R K Patkar Sharada Higher Elementary school run by Kanara Kudal Deshasth Gaud Brahmin Samaj in Cherkadi, Udipi, Karnataka. Assistance of Rs.6.50 lac was approved to SK Patil Vidyamandir in Kelus for construction of classes on 2nd floor of the building out of which Rs.2 lac was released during FY 26 and balance Rs.4.50 lac has since been released in 1st quarter of FY 27.

The list of the religious rituals that can be performed in temple is mentioned earlier in this report. The rules for occupation of Bhaktniwas have also been mentioned in this report elsewhere. We request devotees to inform in advance to Priest in case of requirement of residential accommodation and food requirement to make your stay convenient and pleasant. Any suggestions for improvement in Bhaktniwas facilities are welcome and may be informed in writing to deliberate and consider same. The Seva Samiti is able to offer services to devotees of Mother Goddess and maintain Temple and Bhaktniwas for last 47 years only due to blessings of Mother Goddess and managerial and financial support provided by Shri Devi Chamundeshwari devotees and members like you. We seek your continued guidance, suggestions and financial help to enhance our performance. We pray our beloved mother goddess that her blessings should shower on all of us eternally for our health, financial and spiritual well-being.

Yours sincerely

**Shri Prakash Gajanan Patil**
Hon. Secretary

**Shri Mahendra Damodar Patker**
Chairman

**List of Committee Members**

| | | |
|---|---|---|
| 1. | Shri Satish Dattatreya Patil | President |
| 2. | Smt. Amita Hemant Patil | Vice President |
| 3. | Shri Mahendra Damodar Patkar | Chairman |
| 4. | Shri Prasad Ashok Patil | Hon. Treasurer |
| 5. | Shri Prakash Gajanan Patil | Hon. Secretary |
| 6. | Shri Sanjay Balkrishna Patil | |
| 7. | Shri Nandkishor Bhalchandra Patil | |
| 8. | Smt. Varsha Vijay Patkar | |
| 9. | Shri Chandrashekhar Manohar Patkar | |
| 10. | Shri Shailendra Bhalchandra Patil | |
| 11. | Advocate Shri Nachiket Deepak Patkar | |
| 12. | Dr. Smt. Shobha Vijay Patkar | |
| 13. | Shri Harshad Prakash Patil | |

Contact Persons - **Shri Prakash Gajanan Patil (98339 05632)** in Mumbai
**Shri Harishchandra S. Patil (94235 11534)** Priest and Manager at Andurle.

NOTE

## NOTE

## NOTE

## श्री देवी चामुंडेश्वरी प्रवेश द्वार




## वासंतिक शैक्षणिक वर्ग



# नवरात्रउत्सवानिमित्त मंदिरात तसेच मंदिर परिसरात केलेली नेत्रदिपक विद्युत रोषणाई





Printed By : Shree Sudarshan Printing Press. Goregaon - Mumbai - 9819203677